| जिल्हा परिषद,<br>सांगली<br>आरोग्य विभाग |
|---|
| मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, सांगली—मिरजरोड, पुष्कराजचौक, सांगलीता.मिरज जि.सांगली |
| फोननंबर - ०२३३-२३७३०३२    Email ID - zpdhosan@yahoo.co.in |


वाचले-१)महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ परिशिष्ट-५

२)महाराष्ट्र शासन वित्त विभाग, क्र.अनिओ/१००५/१२६/सेवा-४. दि.३१/१०/२००५

३)महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रनिमं-२००७/प्र.क्र.(४६/०७)१३-अ, दि.१९/१०/२००७

४)महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरकव्ह-२०१२/प्र.क्र.१८६/१२, दि.२८/०२/२०१३

५)महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रनिमं-२००७/प्र.क्र.(४६/०७)१३-अ, दि.२७/०६/२००८

६)सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११११६-ब, दि.१२ डिसेंबर, २०११

७)महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, अधिसूचना दि.०५/१२/२०१२

८)महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रनिमं-१२१४/प्र.क्र.(४३/०७)१३-अ, दि.०५/०६/२०१४

९)महाराष्ट्र शासन वित्त विभाग, अधिसूचना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २०१९ दि.३०/०१/२०१९

१०)महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०१९/प्र.क्र.१४१/आस्था-८ दि.१३/०९/२०२१

११) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि.०४/०५/२०२२

१२)महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रं-संकीर्ण२०२२/प्र.क्र.११/आस्था-८ दि.१५/०५/२०२३

१३)जिल्हा परिषद, सांगली अंतर्गत गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरणेसाठीची जाहिरात क्र.०१/२०२३

१४)जिल्हा निवड समिती सांगली यांनी दि.१४/०८/२०२५ रोजी या कार्यालयास पाठविलेली निवडसूची यादी

१५)दि.२७/०६/२०२५ रोजीच्या कागदपत्रे पडताळणीतील समितीचा अभिप्राय

---

जा.क्र.आरोग्य/आस्था-४/वशि/ 4003 /२०२५      दिनांक:- 28/08/२०२५

---

<u>आदेश-</u>

जिल्हा निवड समिती, सांगली कडून शिफारस केलेल्या खालील उमेदवारांची जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (आरोग्य) (तृतीय श्रेणी) आरोग्य सेवक (महिला) या पदावर वेतनश्रेणी एस-८ (२५५००-८११००) या वेतन संरचनेत अधिक नियमानुसार अनुज्ञेय महागाई भत्ता इतर भत्ते मध्ये नियुक्ती करण्यात येऊन त्यांची पदस्थापना जिल्हा परिषद, सांगली अंतर्गत त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी रिक्त पदावर करण्यात येत आहे.

| अ. क्रं | उमेदवाराचे नांव व पत्ता | मूळ प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | आरती रतन गोसावी,<br>झोपडवस्ती मिरज ता. मिरज<br>जि.सांगली | खुला | खुला<br>(अराखीव) | प्राथमिक आरोग्य केंद्र, विटा (आळसंद)<br>ता. खानापूर जि. सांगली<br>अंतर्गत उपकेंद्र भाळवणी |
| २ | प्रणाली बबन पवार,<br>मु.पो.गौंडवाडी चव्हाणमळा<br>ता.वाळवा जि.सांगली | अ. जा. | खुला<br>(अराखीव) | प्राथमिक आरोग्य केंद्र, येडेमच्छिंद्र<br>ता. वाळवा जि. सांगली<br>अंतर्गत उपकेंद्र रेठरेहरणाक्ष |
| ३ | निता दिलीप बंडगर<br>मु.पो.कुमठे ता.तासगांव जि.सांगली | भ.ज.क | खुला<br>(अराखीव) | प्राथमिक आरोग्य केंद्र, मणेराजूरी<br>ता. तासगाव जि. सांगली<br>अंतर्गत उपकेंद्र उपळावी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | सगुप्ता उस्मान सय्यद<br>शिवनगर तिरंगा चौक, मदिना कॉलनी इस्लामपूर<br>ता.वाळवा जि.सांगली | मुस्लीम | खुला (अराखीव) | प्राथमिक आरोग्य केंद्र, बोरगाव<br>ता. वाळवा जि. सांगली<br>अंतर्गत उपकेंद्र मसुचीवाडी |
| ५ | रोहिणी रामचंद्र सुर्यवंशी<br>मु.पो.काळमवाडी ता.वाळवा<br>जि.सांगली | खुला | खुला (अराखीव) | प्राथमिक आरोग्य केंद्र, येडेमच्छिंद्र<br>ता. वाळवा जि. सांगली<br>अंतर्गत उपकेंद्र किल्ले मच्छिंद्रगड |
| ६ | हर्षदा शंकर साठे<br>मु.पो.कामेरी ता.वाळवा जि.सांगली | अ. जा. | खुला (अराखीव) | प्राथमिक आरोग्य केंद्र, येलूर<br>ता. वाळवा जि. सांगली<br>अंतर्गत उपकेंद्र कुंडलवाडी |
| ७ | किरण लक्ष्मण पवाळकर<br>मु.पो.करवडी ता.कराड जि.सातारा | भ.ज.ब | खुला (अराखीव) | प्राथमिक आरोग्य केंद्र, चिंचणी<br>ता. तासगाव जि. सांगली<br>अंतर्गत उपकेंद्र नागाव |
| ८ | उमा शरद जाधव, MIDC बामनोली<br>ता.मिरज जि.सांगली | खुला | खुला (अराखीव) | प्राथमिक आरोग्य केंद्र, विटा (आळसंद)<br>ता. विटा जि. सांगली<br>अंतर्गत उपकेंद्र ---------- |

**नेमणुकीच्या अटी व शर्ती-**

१) विवाहीत असल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम क्र.२० नुसार ज्याची पत्नी हयात आहे अशा जिल्हा परिषद कर्मचाऱ्यास दुसरा विवाह करता येणार नाही. महिला कर्मचाऱ्यांना ज्यांची पत्नी हयात आहे अशा जिल्हा परिषद कर्मचाऱ्याशी दुसरा विवाह करता येणार नाही.

२) खात्याच्या पुर्व परवानगी शिवाय प्रशिक्षण / शिक्षण घेता येणार नाही.

३) महाराष्ट्र नागरी सेवा (सर्वसाधारण शर्ती) (सुधारणा) नियम २०२१ नूसार उमेदवाराने नियुक्तीचे वेळी खात्रीशीर कागदपत्री पुराव्यासह जन्मतारिख घोषित करील, जेंव्हा उमेदवारांची विहीत शैक्षणिक अर्हता ही माध्यमिक शालांत परिक्षा किंवा त्यावरिल असेल त्याबाबतीत, माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र हे वैद्य दस्ताऐवज असल्याचे मानण्यात येईल अन्य बाबतीत स्थानिक स्वराज्य संस्थेने निर्गमित केलेले जन्म प्रमाणपत्र किंवा ज्या शाळेत तो शेवटी शिकत होता अशा मान्यता प्राप्त शाळेचे प्रमाणपत्र हे वैद्य दस्ताऐवज असल्याचे मानण्यात येईल. त्यानुसार उमेदवाराने जन्मतारखेचे परिशिष्ट-५अ मध्ये हमीपत्र कार्यालय प्रमुखाकडे सादर करावे. त्यानंतर सदर शासन निर्णयाच्या खंडमध्ये विनिर्दिष्ट केलेप्रमाणे शासकिय सेवेत प्रवेश केल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीनंतर अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

४) उमेदवारांनी पदस्थापनेच्या ठिकाणी नियुक्ती आदेश मिळालेच्या दिनाकांपासून ७ (सात) दिवसाचे आत हजर व्हावे. उमेदवार मुदतीच्या आत त्यांचे नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झालेस नियुक्तीचा हक्क रदद होईल.

५) सदर उमेदवारांची नेमणूक तात्पुरत्या स्वरुपाची आहे.

६) उमेदवारास जिल्हा परिषद सेवेचा राजीनामा दयावयाचा असल्यास एक महिनेची आगाऊ नोटीस द्यावी लागेल अथवा एक महिन्याचे मूळ वेतन शासन खाती जमा करावे लागेल.

७) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११११६-ब, दि.१२ डिसेंबर, २०११ अन्वये ज्या उमेदवराची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली व ज्यांचा जाती दाव्याची पडताळणी झालेली नाही अशा उमेदवारास त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैद्यता तपासण्याच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली आहे. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैद्यता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. नियुक्ती स्विकारताच जात वैद्यता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा लागेल व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची साक्षांकित प्रत सादर करावी लागेल. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैद्य ठरविले तर नियुक्ती आदेश त्वरित रदद करण्यात येईल. अशा उमेदवाराविरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्यांचे व त्यांच्या पडताळणचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतूदीनुसार कार्यवाही करणेत येईल. याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने दि.२५ ऑगस्ट, २०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यात आली आहे. यावर मा.सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधीन राहून सदर नियुक्ती आदेश देणेत येत आहेत.

८) उमेदवारास महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ मधील तरतूदीनुसार रुजू तारखेपासून दोन महिनेचे आत वरील उमेदवारांनी आरोग्य खात्याने ठरवून दिलेल्या वैद्यकीय अधिकारी यांचेकडून स्वखर्चाने जिल्हा

परिषदेचे नोकरीत नेमणेस योग्य असलेबद्दल शारिरीक पात्रतेचा दाखला त्यांना हजर करावा लागेल. त्यांनी वरील मुदतीत सदरचा दाखला हजर न केलेस अगर ते जिल्हा परिषदेचे नोकरीत नेमणेस अयोग्य ठरलेस त्यांना नोकरीतून ताबडतोब कमी करणेत येईल.

९) संबंधित उमेदवाराने शासनाने विहित केलेले संगणक वापराबाबतचे प्रमाणपत्र आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षाचे आत सादर करणे आवश्यक राहील, अन्यथा सदरची नेमणूक रद्द करणेत येईल याची नोंद घ्यावी.

१०) महाराष्ट्र जिल्हा परिषद (जिल्हा सेवा) सेवाप्रवेश नियम, १९६७ मधील नियम ६(६) अन्वये उमेदवाराने एक वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड मुदतीसाठी या पदावर समाधानकारकरित्या सेवा केल्यास किंवा परिविक्षीची मुदत समाधानकाररित्या पूर्ण केली असेल किंवा इतर कोणतीही परिक्षा असल्यास, भाषा परिक्षा उत्तीण झाली असेल तो किंवा ते पद धारण करण्याकरिता शासनाने ठरविले असल्यास प्रशिक्षण उमेदवाराने यशस्वीरित्या घेतलेले असल्याशिवाय उमेदवारास जिल्हा सेवेतील पदावर कायम करण्यात येणार नाही.

११) १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर शासकिय सेवेत नियुक्त होणाऱ्या उमेदवारांस नविन परिभषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु ठरते. मात्र सध्या अस्तित्वांत असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे म.ना.सेवा (निवत्ती वेतन) नियम १९८२ व म.ना.से. (निवृत्तीवेतनांचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वांत असलेली सर्वसाधारण भ.नि.नि. योजना त्यांना लागु होणार नाही) त्यानुसार प्रस्तुत उमेदवार नियुक्त झालेस जरुर ती कार्यवाही अवलंबंणेत यावी.

१२) संबंधित उमेदवारांनी मुख्यालयी राहणे बंधनकारक आहे व त्यांचे पालन न केल्यास आपली सेवा समाप्त करणेत येईल यांची नोंद घ्यावी.

१३) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.चारित्र-२११७/प्र.क्र.४८३/१६-अ दिनांक २८/०८/२०१७ नुसार संबंधित उमेदवारांनी नियुतीनंतर सहा महिन्याच्या आत पोलीस खातेमार्फत पुर्व चारित्र्य पडताळणी बाबतचा अनुकूल अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर पुर्व चारित्र्य पडताळणी बाबत अहवाल सहा महिन्याच्या आत संबंधित कार्यालयाकडून प्राप्त न झाल्यास कोणतीही पुर्व सूचना न देता अथवा पोलीस खातेकडून प्रतिकुल शेरा आलेस आपली नियुक्ती संपुष्टात आणणेत येईल याची नोंद घ्यावी.

१४) उमेदवारास महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग दि.२८/०३/२००५ शासन परिपत्रक दि.०१/०७/२००५ मधील नमूद महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुंटूबाचे प्रमाणपत्र) नियम २००५ मधील तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहील. उमेदवाराने हजर होताना दि.२८/०३/२००५ नंतर जन्मास आलेल्या मुलांची संख्या नमूद करुन हयात असलेल्या उमेदवाराची मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल दि.२८/०३/२००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे उमेदवार आरोग्य सेवक (महिला) या पदासाठी अनर्ह ठरणार आहे, असे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र उमेदवाराने सादर करणे बंधनकारक राहील.

१५) सदर आदेशाने नियुक्ती दिल्यानंतर महाराष्ट्र शासन किंवा मा.न्यायालय यांचेकडून निर्देश प्राप्त झालेस अगर संबंधिताच्या नियुक्तीबाबत कोणी आक्षेप घेतल्यास व प्राथमिक चौकशी अंती त्यात तथ्य दिसून आलेस किंवा नियुक्तीच्या वेळी नियुक्तीसाठी सादर केलेली माहिती चुकीची आढळून आल्यास दिलेली नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर व कोणत्याही वेळी रदद करणेत येईल. याबाबत अपील अर्ज करता येणार नाही. तसेच कोणत्याही मा.न्यायालयाकडे दाद मागता येणार नाही.

१६) उमेदवाराने खालील विहीत नमुन्यात प्रतिज्ञापत्र भरुन ज्या कार्यालयात नेमणूक करणेत आलेली आहे. त्यासंबंधित अधिकाऱ्याकडे द्यावे लागले. मी, श्री./श्रीम---------------------- रा.--------------- प्रतिज्ञापत्र लिहून देते की, जिल्हा परिषद सेवेत माझी जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (आरोग्य) (तृतीय श्रेणी) आरोग्य सेवक (महिला) या पदावर वेतनश्रेणी एस-८ (२५५००-८११००) या वेतनश्रेणीत (अधिक प्रचलित नियमानुसार मिळणारा महागाई भत्ता व इतर भत्ते) या मध्ये पुर्णपणे अधिकार असून त्या अटीवर मी ही नेमणूक स्वीकारत आहे.

१७) सदर पदावर रुजू झालेचे दिनांकापासून ३ महिन्याचे आत महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील नियम १७ आणि शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.वशिअ/-१२१४/प्र.क्र.२६/११ दिनांक ०२/०६/२०१४ नुसार विहीत केलेले मत्ता व दायित्व असेटस एण्ड लायबीलीटीज याबाबतचे विवरणपत्र भरुन दयावे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तवणूक) नियम १९६७ मधील नियम १७ (७) नुसार उमेदवारांनी त्यांच्या कुंटुंबियांसंबंधि असलेल्या स्थावर व जंगम मालमत्तेची माहिती विहीत प्रपत्रात कामावर रुजू झालेपासून एक महिन्याच्या आत कार्यालय प्रमुखाकडे सादर करणे बंधनकारक राहिल.

१८) जिल्हा परिषद सेवेत असताना अगर रजेच्या मुदतीत कोणताही व्यवसाय, धंदा अगर इतरत्र नोकरी करता येणार नाही.

(तृप्ती धोडमिसे)भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली

प्रति,

संबंधित उमेदवारास---------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

प्रतिलीपी माहितीसाठी व जरुर त्या कार्यवहीसाठी-
वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, ------------------- ता.-----------------------

२/- वरील उमेदवार हे मुदतीत हजर होतात अगर कसे या बद्दल मुदतीनंतर बिनचुकपणे इकडे अहवाल सादर करणेचा आहे.

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव-

१) अध्यक्ष तथा जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, सांगली
२) मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद सांगली
३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (साप्रवि), जिल्हा परिषद, सांगली
४) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली
५) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ----------------- ता.-------------------
६) तालुका वेद्यकीय अधिकारी, पंचायत समिती, ----------------- ता.--------------------
७) प्रशासकिय अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सांगली

(तृप्ती धोडमिसे)भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली